# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०५ / २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २० / ०२ /२०१८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५, सोमवार दिनांक २६ / ०२ /२०१८.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **सोमवार दिनांक २६ /०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ५   सोमवार दिनांक  २६ / ०२ / २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे होणा-या **विशेष सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ४० | राष्ट्रपुरुष, युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारा भारतीय जनता पक्षाचा उपमहापौर श्री.श्रीपाद छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करणे करीता मा.विशेष सभा घेण्याबाबत. |
| ४१ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २० / ०२ /२०१८.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक :- ४०** **दिनांक : २६ /०२/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** राष्ट्रपुरुष, युगपुरुष श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारा अहमदनगर महानगरपालिकेचा उपमहापौर श्रीपाद छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करणे करीता मा.खास (विशेष) सभा घेण्याबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ - १) मा.सौ.सुवर्णा दत्ता जाधव, सभापती स्थायी समिती व इतर सहा स्थायी समिती सदस्य यांचा दिनांक २०/०२/२०१८ चा अर्ज.

२) मा.श्री.उमेश(गणेश) खंडेराव कवडे व इतर १७ मा.सदस्यांचे दिनांक २०/०२/२०१८ रोजीचे पत्र.

३) मा.श्री.फुलसौंदर भगवान प्रल्हाद, प्रथम महापौर,व मा.बाळासाहेब बोराटे, विरोधी पक्ष नेते व इतर ४ सदस्यांची दि.१७/०२/२०१८ ची यादी.

४) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, कामगार संघटना महासंघ, अहमदनगर यांचे दिनांक १७/०२/२०१८ चे पत्र.

५) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन जा.क्र.०५/श्रमिक/२०१८ दिनांक २२/०२/२०१८

सादर,

विनंतीपुर्वक रिपोर्ट करण्यात येतो की, संदर्भीय पत्र क्रमांक १ च्या पत्रान्वये मा.सौ.सुवर्णा दत्ता जाधव, सभापती स्थायी समिती व १) मा.श्री.बाबासाहेब वाकळे, २) मा.श्री.संजय शेंडगे, ३) मा.श्री.दत्तात्रय कावरे, ४) मा.सौ.उषाताई नलवडे, ५) मा.सौ.अनिता राठोड, ६) मा.श्री.समद खान सर्व स्थायी समिती सदस्य यांचा दिनांक २०/०२/२०१८ चा अर्ज व संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये मा.श्री.उमेश(गणेश) खंडेराव कवडे, सभागृह नेता व इतर १) मा.श्री.सचिन तुकाराम जाधव २) मा.श्री.योगीराज शशिकांत गाडे ३) मा.श्री.दिलीप नानासाहेब सातपुते ४) मा.श्री.बाबासाहेब वाकळे, ५) मा.सौ.सारीका हनुमंत भुतकर, ६) मा.श्रीमती.प्रतिभा विजय भांगरे, ७) मा.श्री.विक्रम अनिलभैय्या राठोड ८) मा.श्री.अनिल माधवराव शिंदे ९) मा.श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे, १०) डॉ.श्री.बोरुडे सागर अर्जुन, ११) मा.सौ.छाया सुरेश तिवारी, १२) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे, १३) मा.सौ.सुवर्णा दत्ता जाधव, १४) मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड १५) मा.सौ.सुनिता दत्तात्रय मुदगल, १६) मा.श्री.अनिल वसंतराव बोरुडे १७) मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे इत्यादी मा.सदस्यांचे दिनांक २०/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये तसेच मा.श्री.फुलसौंदर भगवान प्रल्हाद, मा.प्रथम महापौर व १) मा.बाळासाहेब बोराटे, विरोधी पक्ष नेते, २) सभागृह नेते मा.श्री.गणेश कवडे, ३) मा.श्री.शेख मुदस्सर, ४) मा.सौ.सुवर्णा दत्ता जाधव, ५) मा.सौ.उषा शरद ठाणगे इत्यादी सदस्यांची दि.१७/०२/२०१८ ची यादी अन्वये " दिनांक १६/०२/२०१८ रोजी नगर शहरामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अवमान करणारा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचे आराध्य दैवत असून संपूर्ण जगाला हे ज्ञात आहे. ऐतिहासिक नगर शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच असे घृणास्पद वक्तव्य एका महानगपालिकेच्या सदस्यांकडून घडलेले आहे. अनेक वर्षाच्या इतिहासात या घटनेमुळे काळीमा फासलेला आहे. या घटनेमुळे संपूर्ण भारत देशामध्ये अहमदनगर शहराची व महानगरपालिकेची बदनामी झाली आहे. श्रीपाद छिंदम याने केलेले वक्तव्य हे गैरवर्तणुकीचे व अशोभनिय आहे. त्यामुळे त्यांना मनपाच्या मा.सदस्यांनी त्यांचे नगरसेवक पद रद्द करणे बाबत मागणी केलेली आहे. तरी अहमदनगर महानगरपालिकेचे सदस्य श्रीपाद शंकर छिंदम चे नगरसेवक पद त्वरीत रद्द करण्यासाठी मा.खास सभा तातडीने घेण्यात यावी हि विनंती. " संदर्भीय पत्र क्रमांक १, २ व ३ च्या पत्रान्वये श्रीपाद शंकर छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करणे बाबत मागणी करण्यांत आली आहे.

श्री.बहिरनाथ तुकाराम वाकळे, श्री.शेख फिरोज हसन (राजुभाई शेख) व सोशल मिडीया यांचे संदर्भीय पत्र क्रमांक ४ अन्वये शिवद्रोही श्रीपाद छिंदम या नगरसेवकाचे महानगरपालिकेतील सदस्य पद (नगरसेवक पद) रद्द करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा त्वरीत ओयाजित करणे बाबत कळविण्यांत आले आहे.

तसेच अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियनचे कॉ.अनंत लोखंडे अध्यक्ष, व कॉ.आनंदराव वायकर सरचिटणीस यांनी जा.क्र.०५/श्रमिक/२०१८ दिनांक २२/०२/२०१८ चे पत्रान्वये नगरसेवक श्रीपाद छिंदम याने छत्रपती शिवाजी महाराज यांचेबाबत अवमानास्पद व निंदनीय वक्तव्य करुन गैरवर्तणुक व अशोभनीय वर्तन केले असल्याने दिनांक २६/०२/२०१८ रोजीचे महानगरपालिकेच्या विशेष सभेत त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ मधील कलम १३ अन्वये नगरसेवक पदावरुन काढून टाकणेस पात्र ठरविणे बाबतचा ठराव मंजूर करुन मान्यतेस्तव मा.शासनाकडे पाठविणे बाबतची विनंती केली आहे.

तरी सदरचा विषय मा.महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवणेस सविनय सादर.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेसमोर ठेवा.

**चर्चा :-**

युनियनचे पदाधिकारी यांनी सभागृहात मा.महापौर यांना निवेदन दिले.

**मा.सभागृह नेते श्री.उमेश कवडे :-** सर्वानुमते हा विषय हाताळला पाहीजे. आजची सभा ही एक विकृत प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी एकत्र आलो आहोत. बहुमतासाठी हा विषय घेतला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची जी नाचक्की देशभरात झाली त्याचा निषेध नोदवण्यासाठी ही सभा आयाजित केली आहे. अशा नीच कलंकी माणसाला नगरमध्ये राहण्याचा अधिकार नाही. सर्वानूमते छत्रपती शिवाजी महाराज यांचे बद्दल अपशब्द वापरणे ही विकृत प्रवृत्ती आहे मी माझी भूमिका याठिकाणी मांडत आहे.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** हिंदूस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचेबद्दल अपशब्द वापरणा-याचा मी भाजपचा गटनेता या नात्याने छिंदम याचा निषेध करतो. त्यांचे सदस्यत्व रद्द करावा. अशी मी मागणी करतो व तसा ठराव सभागृहाने संमत करावा. छिंदम याचा राष्ट्रीय स्वयंसेवक यांचा केव्हाही संबंध आला नाही. आपल्या आराध्य दैवताबद्दल अपशब्द वापरणा-या नगरसेवकाचे नगरसेवक पद रद्द करण्यात यावे. छिंदम व भारतीय जनता पक्षाचा कुठलाही संबंध राहीलेला नाही.

आज या सभेमध्ये अशा प्रकारच्या विषयावर बोलतांना मी स्वतःला अत्यंत दुर्दैवी समजतो व आजच्या सर्व साधारण सभेतील हा काळा दिवस आहे. छिंदम यांच्या वागण्याने सर्वांचीच मान शरमेने खाली गेली आहे. त्याबद्दल मा.न्यायालय / जनता त्यांला योग्य ती शिक्षा देईलच मात्र या सभागृहाचे ते सदस्य असु नयेत. अशीच सर्वांची भावना आहे. त्यामुळे त्यांचे सदस्यत्व रद्द करावे व तसा ठराव या सभागृहाने मंजूर करावा अशी मागणी मी करीत आहे.

छिंदम याच्या संदर्भात एक खुलासा होणे हे अत्यंत गरजेचे आहे की तो राष्ट्रीय स्वयं सेवक संघाशी कधी ही संबंधित नव्हता. एखाद्या कार्यक्रमात संघाचा गणवेश घातला म्हणजे तो संघ स्वयंसेवक होत नाही. या संदर्भात व्हॅटस्अपवर प.पु.मोहनजी भागवत यांच्या फोटो बरोबर पुढील वाक्ये माझ्या वाचनात आली. त्याचा उल्लेख करावासा वाटतो. जबतक राजनितीक कार्यकर्ता अपने व्यक्तीगत स्वार्थ के लिये स्वयंसेवक बननेका ढोंग करते रहेंगे ना समाजका भला होगा न राष्ट्रका और नही संघका |

मा.महापौर साहेब या शहराने अनेक प्रसंग पाहीले मात्र छिंदम यांचे उदगार हे अत्यंत वेदनादायी असे होते. आपल्या आराध्य दैवताचा अवमान करणा-या या सदस्याचे सदस्यत्व रद्द करावे अशी मी सभागृहात मागणी करतो. या संदर्भात कुठलाही पक्षीय अभिनवेश न ठेवता या मागणीला सर्वांनी पाठींबा द्यावा, ही विनंती.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** तो कधी संघात नव्हता. संघही त्याचा निषेध करतो. त्या व्यक्तीचा दोष आहे. त्याचे नगरसेवक पद रद्द करावे अशी मी मागणी करतो. संघाची माणसे महाराजांबद्दल आदर व्यक्त करतात. व आर.एस.एस.च्या प्रत्येक कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा असते. या देशाचे मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशिर्वादानेच कामांची सुरुवात करतात.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** छिंदम यांचेवर देशद्रोहीचा गुन्हा का दाखल होत नाही. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. मुख्यमंत्र्यांनी देशद्रोहाचा गुन्हा छिंदमवर दाखल करावा. हार्दिक पटेलवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल होतो. मग छिंदमवर का होत नाही. गुन्हेगार लोकांना आपण का तिकीट देतो. तरुण पिढीला राजकीय संदेश राजकीय नेत्यांनी दिला पाहीजे. भाजपाच्या एकाही आमदाराने अजुनही निषेध केला नाही. महाराष्ट्राबाहेर छत्रपतींचा फोटो लावत नाही. आपण तसे पत्र पाठवा.

**मा.सौ.मनिषा बारस्कर काळे :-** छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करावे अशी मी सर्व पक्षाचे वतीने मागणी करते तसेच त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा. शिवाजी महाराजांबद्दल कोणीही अपशब्द यापुढे वापरु नये. या सभागृहाला जिजाउ माँ साहेबांचे नांव देण्यात आले आहे. परंतु सभागृहात त्यांचे नांवाचा फलक दिसत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** जिजाउ माँ साहेबांच्या नावाचा फलक सभागृहाच्या प्रवेश व्दारावर लावण्यांत आलेला आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** निषेध सर्वांनी केलेला आहे. महाराज जाती धर्मांत प्रांतातवाटुन गेलेले नाहीत. आपल्या भारताला जगण्याची पध्दत महाराज यांनी शिकविली. महारांजाबद्दल बोलण्याची पंतप्रधान पदावरील व्यक्तीचीही लायकी नाही. कॉग्रेस असेल, राष्ट्रवादी असेल, सर्व शिवप्रेमींच्या वतीने विनंती करतो आपल्या ऑफीस समोरील प्रांगणात शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारावा अशी शिवप्रेमींच्या वतीने विनंती करतो. १५ फुटी चांगला पुतळा बसवा. पुतळयाच्या हातात चांगली तलवार बसवा. तसा ठराव आजच्या सभेत घेण्यात यावा. उपस्थितांनी हात वर करावे.

उपस्थित सर्व सदस्यांनी हात वर केले.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणेकामी माझा वर्षभराचा नगरसेवक निधी घेण्यात यावे.

**विरोधीपक्ष नेता मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महानगरपालिकेचा मोठा अपमान छिंदम यांनी वापरलेल्या अपशब्दामुळे सर्व महाराष्ट्रात झालेला आहे. २००८ साली ठराव केला. संभाजी महाराज पुतळयाचे कामी रु.८,३५,०००/- दिले आहेत. पुतळा का उभारत नाही. संभाजी महाराजांचा पुतळा तयार आहे. तो कोठेही बसवा. कोणत्या तरतुदीनुसार आपण छिंदम याचे पद रद्द करु शकतो नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ अन्वये पालिका सदस्य काढुन टाकणेची तरतुद वाचन केले.

**विरोधीपक्ष नेता मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सर्वानुमते ठराव करा व राज्य शासनाकडे पाठवा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार ठराव करावा व त्याचे पद घालवा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** माजी उपमहापौर छिंदम यांने अत्यंत खालच्या दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वक्तव्य केल्याने त्याचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी ही सभा बोलावली. लोकांच्या जागा लुबाडणे, मद्यधुंद अवस्थेत असणारा, मुलींचे लैगीक शोषण करणारा असा छिंदम होता. भा.द.वि. कलम १२० ब प्रमाणे त्याच्यावर देशद्रोहाचे कलम लावण्यासाठी मी पत्र दिले आहे. याचा सुध्दा ठरावात उल्लेख करावा.

**मा.सौ.छाया तिवारी :-** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अत्यंत हीन शब्द वापरले त्याचे नगरसेवक पद रद्द करा.

**मा.सौ.सुवर्णाताई कोतकर :-** छिंदम याने जे शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द वापरले त्याचा कॉग्रेस पक्षा तर्फे निषेध करते. व त्याचे नगरसेवक पद रद्द करावे तसेच देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा असे कॉग्रेस पक्षातर्फे सांगते.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** छिंदमचे पद आपण रद्द करतोच आहोत. यापुढे कुणीही सर्व राष्ट्रीय पुरुषांबद्दल अपशब्द वापर करुन वक्तव्य करु नये. श्री.कुमार वाकळेंच्या सुचनेला मी अनुमोदन देतो. पुतळा उभारण्यात यावा. छिंदम याला समाजा बाहेर फेकावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आज ज्या कारणास्तव महासभा बोलावली आहे. महाराष्ट्रात, देशात शुक्रवार दिनांक १६/०२/२०१८ शुक्रवार नगर शहराच्या इतिहासामध्ये काळा दिवस आहे. भाजपाचे त्यावेळचे अस्तित्वात असलेले उपमहापौर व त्या पदावर असतांना केलेले वक्तव्य शिवाजी महाराजांबद्दल अपमानास्पद शब्द वापरले. असा तो काळा दिवस ठराव करतांना सर्व सामान्य कर्मचारी श्री.अशोक बीडवे, याने त्यांचे पदाचा संस्थेचा विचार न करता शिवाजी महाराजांबद्दल अपमान खपवुन घेतला नाही. सर्व प्रथम बिडवेंच्या अभिनंदनाचा ठराव करावा. कर्मचा-यांच्या पाठीमागे सर्वांनी उभे राहीले पाहीजे. एक दिवस खाकी चड्डी घातली व टोपी घातली तर तो आर.एस.एस. चा होत नाही. ज्या दिवशी पेपरला फोटो आला त्याच्या दुस-या दिवशी आपण का नाकारले नाही. सभागृहात एखादी घटना घडल्यानंतर त्यावर पडदा टाकायचा हे योग्य नाही. सभागृहात सदस्यांनी वक्तव्य केले. पुर्ण महाराष्ट्र त्यादिवशी रस्त्यावर होता. पुढचा पाठपुरावा करायची जबाबदारी आपल्यावर आहे. एफ आर.आय.मध्ये कोणते कलम लावले या प्रकरणाचा पूर्णपणा करायचा असेल तर आपण पाठपुरावा करावा.

संभाजी महाराजांच्या पुतळा बसविणे संदर्भात मागणी मा.सभागृहात झाली. कैलास गिरवले यांनी वारंवार पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याची प्रशासन दखल घेत नाही. एम.आर.ट्रेड सेंटरला नाव देणे संदर्भात विसर पडला आहे. मा.जिल्हाधिकारी यांची परवानगी घेवून ऑफिस समोर पुतळा बसवा. जोपर्यंत प्रोसेस होत नाही तोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे तैलचित्र लावण्यात यावे. ऑफिस मधील पॅसेज मध्ये बसवावे अशी मी विनंती करतो. आजची सभा ज्या कारणास्तव बोलवली. छिंदमला जर नगरसेवक पदावरुन घालवायचे असेल तर त्याला दुस-या दिवशी नोटीस द्यायला पाहीजे होती. ऑफिस रिपोर्ट मंजूर केला तर त्याचे पद रद्द होणार नाही. बिडवे याने एफ आय आर मध्ये त्याने सरकारी कामात अडथळा आणला हे महत्वाचे आहे. त्याचा उल्लेख करावा. शासनाकडुन काही उणिवा येणार नाहीत अशा रितीने ठराव करावा. छिंदमच्या नगरसेवक पदाचा राजीनामा उपस्थित भाजपच्या सदस्यांनी आणावा अशी माझी विनंती आहे. आयुक्त तो मंजूर करतील. राज्यशासनाची वाट पाहू नका. अर्धा तास यासाठी सभा तहकुब करा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ते आता जेल मध्ये आहेत आपणही आमच्या बरोबर सही साठी यावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुम्ही ठराव व्यवस्थीत करा. राज्य शासनाचे मत घ्या. विधीतज्ञाचे मत घ्या. चारही बाजुंनी चौकशी करुन त्याचे पद घालवा. शहर कॉग्रेस जिल्हा अध्यक्ष या नात्याने मी त्याचा निषेध करतो. शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले तसेच इतर थोर राष्ट्रीय पुरुषांबद्दल वक्तव्य करु नये. दिप चव्हाण म्हणुन मी या ठिकाणी विचार मांडतो. भाजपचा उमेदवार या ठिकाणी नसावा. अशी मी मागणी करतो. शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द वापरल्यामुळे भाजपने उपमहापौर या पदावर कोणालाही बसू नये.

**मा.सौ.उषा नलवडे :-** सर्व पक्षांतर्फे शिवप्रेमी तर्फे मी निषेध करते. अशा देशद्रोहीला कुठल्याच पदावर बसण्याचा अधिकार नाही. सर्व सदस्यांना विनंती श्रीपाद छिंदम याने जो शिवाजी महाराजांचा अपमान केला त्याबद्दल त्याची हकालपट्टी करावी. त्याचे नगरसेवक पद रद्द करावे.

**मा.श्री.महेश तवले :-** छिंदम यांनी केलेल्या वक्तव्या बद्दल भाजपा व शिवप्रेमींच्या वतीने तिव्र शब्दात निषेध करतो. भाजपाने तात्काळ उपमहापौर पदावरुन हकालपट्टी केली आहे. नगरसेवक पदाच्या हकालपट्टीचा ठराव आपण आज या ठिकाणी करणार आहोत. सर्वांनी नगर शहरातच नाहीतर महाराष्ट्रा बाहेर हद्दपार करावे असा ठराव केला पाहीजे व देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मी मागणी करतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** त्याचे नाव घ्यायची लायकी नाही. संपत बारस्कर म्हणाले तो हीरो होता झिरो झाला तो केंव्हा हिरो होता.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** झिरो कशामुळे झाला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द वापरले म्हणुन झिरो झाला. असे मी म्हणालो होतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सन्माननीय नगरसेवकांनी त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी ही सभा बोलावली आहे. भाजपाचे खासदार छत्रपती शिवाजी महाराजांचे जयंतीच्या दिवशी बुट घालून छत्रपतींना हार घालतात माझ्याकडे त्याची व्हीडीओ क्लीप आहे. तुम्ही नगरसेवक पदाचा राजीनामा तात्काळ घेतला का नाही. उपमहापौर पदाचा राजीनामा घेतांना तो जेलमध्ये होता. का त्याचे नाव घेण्याचीही लायकी नाही.

**सभागृह नेता मा.श्री.गणेश कवडे :-** एक सदस्य बोलत असतांना दुस-या सदस्याने मधेच बोलू नये.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** या ठिकाणी बिडवेचे देखिल अर्जानुसार त्याने गैरवर्तन केले या अर्जानुसार राज्य शासनाकडे त्वरीत प्रस्ताव पाठवा. नगरसेवक पदाचा त्वरीत राजीनामा घ्यायला पाहीजे होता. त्याचे नगरसेवक पद रद्द करावे अशी मी मागणी करतो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** शुक्रवार दिनांक १६ हा अहमदनगर महानगरपालिकेचा नव्हेतर संपूर्ण जगाला काळीमा फासणारा दिवस तत्कालीन उपमहापौर विद्यमान नगरसेवक छिंदम यांचे वक्तव्यामुळे पुर्ण जगाचे नाव बदनाम झाले. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अशोभनिय वक्तव्य करुन जो अपमान केला त्याबद्दल त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी आजची सभा बोलावली आहे. श्री.बिडवे याच्या बद्दल अपशब्द वापरुन छत्रपती शिवरायांबद्दल निंदनिय वक्तव्य केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कायदेशीर तरतुदी त्यांचेवर बंधनकारक आहे. कलम १३ (१) अन्वये त्याचे नगरसेवक पद रद्द करावे. ख-या अर्थाने त्याचे नगरसेवक पदाचा राजीनामा घ्यायला पाहीजे होता. वरती भाजपाचे सरकार आहे. त्वरीत त्याचे पद शासनाकडुन रद्द केले तर महाराजांबद्दल प्रेम व्यक्त होईल. महाराजांबद्दल बोलणा-या व्यक्तीचा मी निषेध करतो.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषाबद्दल आपल्याच महानगरपालिकेचे उपमहापौर हे महाराजांबद्दल वक्तव्य करतात. मी माझे वतीने व पक्षाचे वतीने निषेध व्यक्त करतो. त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यांत यावे. आयुक्तांनी घटनेच्या दुस-या दिवशी शासनाकडे पत्र देवून कळवायला पाहीजे होते. छत्रपतीबद्दल असे उदगार कसे निघू शकतात. यापुर्वी त्याने जे छत्रपतींना हार घातले ते सर्व नाटक होते असेच म्हणावे लागेल. छत्रपतींविषयी कोणाच्या मनात अनादर असु शकत नाही. नगर शहरात अशी घटना व्हायला नको होती. भारतीय जनता पार्टीने त्याचा नगरसेवक पदाचा राजीनामा घ्यायला पाहीजे होता. या पदावर राहण्याची त्याची लायकी नाही. आज मी सर्वांच्या वतीने याठिकाणी निषेध व्यक्त करतो. दिप चव्हाण यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे पुतळयाबद्दल वक्तव्य केले. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात यावा.

**मा.महापौर मॅडम :-** या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांना आम्ही भेटलो आहोत. जागेची निश्चिती चालू आहे.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** आजच्या सभेचा जो विषय आहे. छिंदम याचे नगरसेवक पद रद्द करण्याचा महाराजांबद्दल जे शब्द वापरले ते निंदणीय आहेत. पदाचा व संपत्तीचा गर्व नसावा. ज्या पदावर आपण असतो त्या पदाचा नेहमी सुयोग्य वापर करावा. त्याचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** दिनांक १६ हा नगरच्या दृष्टीने काळा दिवस आहे. छिंदम याने जो महाराजांचा अपमान केला त्याचा भाजपाच्या वतीने निषेध व्यक्त करतो.या घटनेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्याची हकालपटट्ी केली आहे.सर्व नगरसेवक मिळुन आम्ही पत्र पाठवु व त्याची स्वाक्षरी घेवु त्याचा राजीनाम मागवुन घेवु.मा.महापौर यांनी त्याचा राजीनामा सरकारकडे पाठवावा.माझा मानधनाचा चेक मी या ठिकाणी शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी देत आहे. त्याचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मी मागणी करतो.

**मा.सौ. नंदा साठे :-** माझे वतीने व भारतीय जनता पार्टीचे वतीने मी या वक्तव्याचा या ठिकाणी निषेध व्यक्त करते.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** छिंदमचे पद रदद् होण्यासाठी आपण याठिकाणी बसलो आहोत.छिंदम उपमहापौर पदावर असताना सभागृहातील त्या खूर्चीवर बसत नव्हता. त्याची त्या पदावर बसण्याची लायकी नव्हती त्याची व्हिडीओ क्लिप व्हायरल झाली बिडवेच्या माध्यमातुन शिवाजी महाराजांनी त्याला शासन केले.छिदमचे नगरसेवक पद रदद्  करावे अशी सर्वांच्या वतीने मागणी करते.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** कृष्णाजी भास्कर कुलकर्णी सारखा छत्रपतींना मारण्यासाठी त्याने अफजलखानाला सहकार्य केले.हा इतिहास लपवला जातो.तशा प्रवृत्तीचे लोक त्यावेळीही होते व आजही आहेत.आरएसएस कार्यालयात कधी शिवजयंती साजरी झाल्याचे आठवते का.

सभागृहात सदस्यांमध्ये गोंधळ

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** विषय सोडुन बोलायचे कारण नाही

**मा.श्री.कैलास गिरवले :-** छत्रपतींचे नाव घेवुन राजकारण करता जे पोटात आहे ते ओठावर येते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** असे जो शब्द वापरतो तो कोणत्याही पक्षाचा असु शकत नाही.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** छिंदमच्या नावाअगोदर अजेंडयावर जो भारतीय जनता पार्टीचा उल्लेख केलेला आहे तो वगळण्यात यावा मा.महापौर यांना विनंती करतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** गिरवले मामा छिंदमवर काय बोलायचे ते बोला संघावर बोलण्याचा तुम्हाला अधिकारी नाही संघावर बोलु नका हि विनंती.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** छत्रपतीबददल ज्यांनी वक्तव केले त्यांना छत्रपतींचा इतिहास माहिती नाही.छत्रपतींचे आजोबा मालोजीराव यांना पुत्रप्राप्ती होत नव्हती. त्यावेळी अहमदनगर येथील शहाशरीफ हा दर्गा आहे त्याठिकाणी येवून मालोजीरावांनी पुत्रप्राप्तीसाठी नवस केला त्यांना दोन पुत्र प्राप्त झाले. त्यांनी एकाचे नाव शहाजी व शरीफजी ठेवले. त्यापैकी शहाजी राजांचे पुत्र छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. अशा प्रवृत्तीचे लोक वेळीच ठेचले पाहीजेत. बिहाणी प्रकरणामध्येही त्यांचा हात आहे. डिपार्टमेंटला भेटून आपण सांगूच येथुन पुढे अशा लोकांना बरोबर घ्यायचे की नाही याबाबत योगीराज गाडे यांनी याआगोदर वक्तव्य केले याची सुरुवात अगोदर आपल्या पिताजींना त्यांनी सल्ला द्यावा. आपल्या घरापासुन चांगली सुरुवात करावी. तिकीट देतांना योग्य व्यक्तीला तिकीट द्या. छत्रपती संभाजी महाराज पुतळया बाबत आम्ही यापुर्वी विषय मांडला. त्यास तात्काळ मंजूरी मिळाली. परदेशी चित्रकार यांचे दीड दोन लाखाचे बिल पेंडींग आहे.

**मा.महापौर मॅडम :-** चेकचा प्रॅाब्लेम नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** प्रोफेसर कॉलनी चौकात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसविण्यासाठी ठराव झाला आहे. आपण सर्वांनी त्यासाठी प्रयत्न करावा. सभागृहाला विनंती अशा प्रवृत्तीला ताबडतोब ठेचून काढावे. त्याचे नगरसेवक पद रद्द करावे. शासन स्तरावर पाठपुरावा करावा. ठराव करतांना कायदेशीर अडचणी येणार नाहीत अशा पध्दतीने कायदेशीर सल्ला घेवून ठराव करावा.

**मा.सौ.विणा बोज्जा :-** छिंदम याचा पद्मशाली समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करते. छिंदमचे पद कायदेशीर पध्दतीने रद्द करावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मी आत्ता जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाबद्दल बोललो त्याबद्दल रुलिंग द्यावे ही सर्व सन्माननीय सदस्यांचे वतीने मागणी आहे. तडवी साहेबांना पुढील प्रक्रीया करता येईल.

**मा.महापौर मॅडम :-** आज या सभागृहात सर्व सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे संदर्भात सूचना मांडली. अहमदनगर महानगरपालिकेच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणेसाठी सर्वानुमते ही सभा मंजूरी देत आहे. संभाजी महाराजांच्या पुतळयाची कार्यवाही सुरुच आहे. सभागृहाच्या आतमध्येही जिजाउ मॉ साहेबांच्या नावाचा फलक लावणेत येईल.

**मा.सौ.रुपाली वारे :-** छिंदम याचा नगरसेवक पदाचा राजीनामा अद्याप घेतलेला नाही. त्यामुळे सदस्यांनी त्याची जबाबदारी झटकुन चालणार नाही. आपण जे बोलतो त्याकडे सर्वांचे लक्ष असते. भविष्यात आपणांस माफी मागण्याची वेळ येवू देवू नये.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे बाबत ताबडतोब रुलिंग द्या.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आपल्या संस्थेच्या एका माजी पदाधिका-याने जे महाराजांबद्दल अपशब्द वापरले त्याबद्दल सर्व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ब-याच जणांना या घटनेमुळे रडू कोसळले, अनेक जणांचे रक्त सळसळले छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द त्याने वापरले याचा निषेध करण्यासाठी मा.आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. एखादा अपघात झाल्यावर ती व्यक्ती आपल्या कुटुंबातील आहे असे समजून ज्या प्रकारच्या भावना होतात तशाच भावना सर्वांच्या डीवायएसपींना भेटायला गेलो त्यावेळी उपस्थितांच्या होत्या. त्वरीत देशद्रोहाचा त्यांचेवर गुन्हा दाखल करावा. पोलीस प्रशासनाने त्यावेळी मत व्यक्त केले. वरिष्ठांची जोपर्यंत ऑर्डर येत नाही तोपर्यंत आम्हाला पाउल उचलता येत नाही. ९ वी १० वी च्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल आहेत. ती घटना घडली त्या दिवशी त्यांना कळाले असेल. त्यांना शिवरायांबद्दल धडयाव्दारे शिक्षण शिकवुन दिले जाते. त्यांच्या मानसिकतेवर काय परिणाम झाला असेल. पृथ्वीवर जो पर्यंत तो असेल तो पर्यंत अपशब्दाने त्याच्या नावाचा उल्लेख करावा. शिवसेनेने पक्ष श्रेष्ठी उध्दवजींना मागणी केली असती तर त्या दिवशी गुन्हा दाखल झाला असता. आज पासुन विधानसभेचे अधिवेशन सुरु झालेले आहे. अजुनही वेळ गेलेली नाही. आमच्या पक्षाचे आमदार मुंबईत उपस्थित आहेत ते सुध्दा देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करतीलच त्याचे नगरसेवक पद रद्द होईलच ठरावात या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची सर्व पक्षांच्या वतीने सर्व सदस्यांच्या वतीने मागणी करतो. ठरावात तसा उल्लेख करावा. मा.आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे वतीने व माझे वतीने मी या ठिकाणी निषेध व्यक्त करतो.

**मा.सभापती, स्थायी समिती सौ.सुवर्णाताई जाधव :-** छिंदम या नालायक माणसाने जे शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द वापरले त्याचा जो गर्व होता पालिका त्याच्या बापाने विकत घेतल्या सारखी होती. त्याचेवर या ठिकाणी तडीपारचा गुन्हा दाखल केला पाहीजे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना व सर्व पक्षांच्या वतीने मी या ठिकाणी निषेध करते.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** कुमार वाकळे यांनी जो छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे व संभाजी महाराजांचा पुतळा बसविणे तसेच छत्रपती शिवाजी महाराज असे वाडियापार्कचे नामकरण करणे याचा सर्व पक्षीय पाठपुरावा करावा.

**मा.श्री.अनिल बोरुडे :-** सर्व पक्षांच्या वतीने मी छिंदम याचा निषेध व्यक्त करतो. पुढच्या बोर्डा अगोदर छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमा सभागृहात लावण्यात याव्यात.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारणेचे भुमीपुजन करण्यांत आले. दुर्बिनीतून नागरिकांनी ते पाहीले. वृत्तपत्रातून ते वाचण्यात आले. परवाच या संदर्भात आंदोलन झाले. पाथर्डी मध्ये अजुनही छिंदमच्या वक्तव्याबद्दल आंदोलन चालू आहे. प्रशासनाने ठराव कशा पध्दतीने करणार कायद्याचा काय आधार राहणार, प्रशासन अहवाल कसा पाठवणार आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** आजचा जो छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करण्याचा विषय आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ (१) प्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर केला जाईल. नियमानुसार १३ (१) नुसार शासन स्वतः होवून निर्णय घेवू शकते किंवा महानगरपालिकेच्या ठरावानुसार निर्णय घेवू शकते. ३/४ बहुमताची आवश्यकता ठरावासाठी आहे. याठिकाणी ५५ सदस्य उपस्थित आहेत. त्यामुळे अडचण नाही. राजीनामा पक्षाने सादर केल्यास ठरावाचा प्रश्नच राहणार नाही. आपल्या भावना शासनास अवगत करण्यांत येतील. १३ (ब) ची पुर्तता याठिकाणी झालेली आहे. याठिकाणी कुठल्याही त्रुटी राहणार नाहीत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** भाजपा गटनेत्याचे पत्र या ठिकाणी घ्या. त्याची कॉपी नगरविकास विभागाकडे पाठवून द्या. ठरावा बरोबर बिडवेंनी दाखल केलेली ३५३ ची कॉपी जोडा. त्यानंतर छिंदम याच्यावर पोलीसात जेवढे गुन्हे नोंद झालेत तडीपारची ऑर्डर, त्याचेवर कोणकोणते गुन्हे दाखल झालेत तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे वेगवेगळया संघटना, सदस्य यांनी केलेल्या मागणीचे पत्र जोडण्यात यावेत. बहुमताने हा ठराव मंजूर झाला त्याची प्रत, सर्व सभेच्या कामकाजाची रेकॉर्डींग, अनर्हता बाबत, स्वतंत्र अहवाल आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा व त्यानंतर शासनाकडे पाठवावा. या ठरावावर मतदान होणे अत्यंत महत्वाचे आहे. सभेच्या अगोदर प्रत्येक गटनेत्याने व्हीप काढायला पाहीजे होता. भाजपाच्या गटनेत्याने ठराव मांडा. यामध्ये छिंदम भाजपा नगरसेवक होता. वॉर्ड क्रमांक १७ (अ) मधुन तो भारतीय जनता पक्षाचे कमळ चिन्हावर निवडुन आला. मी पक्षाचे व वरिष्ठांचे आदेशाने व्हीप समजुन त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यांत येत आहे. असा उल्लेख करण्यांत यावा.

सर्व कर्मचारी यांनी त्या दिवशी महानगरपालिकेचे कामकाज बंद केले. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी युनियनचे कागदपत्र त्यासोबत जोडायला पाहीजे. सर्व गोष्टी प्रशासनाने करायला पाहीजे होत्या. आयुक्त व प्रशासनाने एवढी मोठी घटना झाल्यानंतर काहीच केले नाही. मी या ठिकाणी ज्या आठ गोष्टी सांगीतल्या त्या जोडल्या तरच ठराव परीपुर्ण होईल.

**मा.सभागृह नेता श्री.गणेश कवडे :-** विषय पत्रिकेवरील विषय वाचण्यांत यावा. सर्वांना विनंती करतो याठिकाणी सभागृहात जो शिवछत्रपतींचा पुतळा मांडण्यात आला. तो प्रत्येक सभेत मांडण्यात यावा. व त्यास पुष्पहार अर्पण करुन सभा सुरु करण्यांत यावी.

विषय पत्रिकेवरील प्रस्तावाचे वाचन करण्यात आले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नगरसचिव कार्यालयाकडून आजच्या सभेचा अजेंडा प्राप्त झाला. त्यामधे गणेश कवडे व इतर १७ सदस्य असा उल्लेख करण्यात आला आहे. सर्व १७ सदस्यांचे नांवे का टाईप करण्यांत आली नाही. यापुढे सर्वांची नांवे घेण्यात यावी.

**मा.श्री.गणेश भोसले :-** छिंदमच्या नावापुढे श्री उल्लेख केलेला आहे.

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** मा.स्थायी समितीच्या चार सदस्यांनी पत्र दिले किंवा १/४ सदस्यांनी मागणी केल्यानुसार विशेष सभा बोलावली जाते. त्या तरतुदीनुसार ही सभा आयोजित करण्यात आली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** महासभेच्या कामकाजातुन श्री शब्द वगळण्यात यावा. स्टॅंडींगच्या चार सदस्यांनी पत्र दिले तर तुम्ही सभा काढता. ७३ सदस्यांनी तुम्हाला पत्र दिले महासभा काढा तर तुम्ही महासभा काढणार का ?

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** सभा बोलाविण्याचे अधिकार मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण दोन मध्ये महानगरपालिकेचे कामकाज (ड) तरतुदीचे वाचन केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मा.महापौर यांनी रुलिंग द्यावे. विषय महासभेत घेता येतो.

**मा.श्री.गणेश कवडे :-** सगळयांच्या वतीने मागणी त्याचेवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा. त्याला तडीपार करण्यात यावे. सगळयांचे पत्र जोडण्यात आले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्रस्तावामधील यादीमध्ये भगवान प्रल्हाद फुलसौंदर, प्रथम महापौर यांचे नांव आले आहे. ते वगळा ते नगरसेवक नाहीत. स्थायी समिती सदस्यांमध्ये त्यांचे नावाचा उल्लेख केला आहे. ते वगळण्यांत यावे. श्री.कावरे गटनेता यांनी मतदानासाठी प्रस्तावा मांडावा.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** मी दत्तात्रय हरीभाउ कावरे, भारतीय जनता पार्टी गटनेता सर्व सदस्यांना विनंती करतो छिंदम याचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे व त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी हात वर करुन मतदान करावे.

उपस्थित सर्व सदस्यांनी हात वर केले.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** भाजपाचे दोन गटनेते आहेत. त्यांनी ठराव मांडला यापैकी ओरीजनल कोण व डुप्लीकेट कोण महापौरांनी यांचा खुलासा करावा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नगरसचिव, नगरसेवक यांनी कोणी कोणी हात वर केले याची नोंद करुन घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** नगरसचिव, नोंद करा.

**प्र.नगरसचिव श्री.तडवी :-** मी हजेरी पुस्तकात उपस्थित सर्व सदस्यांच्या स्वाक्ष-या घेतलेल्या आहेत. ज्यांचा या ठरावास विरोध असेल त्यांनी हात वर करावे म्हणजे मला नोंद घेणे सोपे होईल.

कोणीही सदस्यांनी हात वर केले नाहीत.

**मा.महापौर मॅडम :-** सर्वानुमते ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिकेचे २०१८-२०१९ चे डायरीत उपमहापौरांचे नाव व फोटो छापण्यात येवू नये.

**विरोधीपक्ष नेता मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** भाजपाचे गटनेते यांनी जो ठराव याठिकाणी मांडला त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर मॅडम :-** सर्वांचे बोलणे झाले असे समजुन छिंदम याचे नगरसेवक पद रद्द करण्याचा ठराव मा.शासनाकडे पाठविण्यास तसेच त्याचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीपाद छिंदम अहमदनगर महानगरपालिका यांचे नगरसेवक पद रद्द करण्यास ही सभा मान्यता देत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ नुसार नगरसेवक पद रद्द करणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव प्रशासनाने तयार करुन मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

मा.सभागृहातील सदस्यांचे मागणी नुसार श्रीपाद छिंदम याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी.

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सर्व सन्माननीय सदस्यांच्या मागणी नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा हिंदू ह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन, अहमदनगर महानगरपालिका प्रशासकीय इमारती समोरील जागेत बसविणे बाबत प्रशासनाने योग्य ते कार्यालयीन सोपस्कार पार पाडुन कार्यवाही करावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दत्तात्रय हरीभाऊ कावरे,

अनुमोदक : मा.श्री.चंद्रशेखर बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : **सोमवार दिनांक ०५/०३/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **सोमवार दिनांक ०५/०३/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक : २१ / ०२ / २०१८.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **सोमवार दिनांक २६/०२/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

अति.आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहर अभियंता | : | या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व नागरिक यांच्या संख्येनुसार सभागृहातील बैठक व्यवस्था पाहुन ज्या सोयी सुविधा सभेसाठी आवश्यक असतील त्या कराव्यात |
| २) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| ३) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ४) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ५) | श्री.राजेंद्र गायकवाड, घनकचरा व्य.वि., श्री.अनंत द्रविड, सावेडी प्र.कार्या. | : | महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ६) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहा. आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ७) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ८) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.AMC.-
दिनांक : २१ / ०२ /२०१८.

१) श्री.शंकर बहिरवाडे, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.ए.जी.झारखंडे, महिला व बालकल्याण समिती विभाग,
३) श्री.जैनुद्दीन हरियाणावाला, स्थायी समिती विभाग,
४) श्री.मच्छिंद्र शिंदे, नगरसचिव विभाग,
५) श्री.ज्ञानेश्वर काटकर, सामान्य प्रशासन विभाग,
६) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
७) श्री.प्रशांत आंबेकर, प्रसिध्दी विभाग
८) श्री.रविंद्र जपे, बांधकाम विभाग
९) श्री.संतोष कांबळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग
१०) श्री.अशोक विठ्ठल जावळे, नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **सोमवार दिनांक २६/०२/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०५, सोमवार दि. २६/०२/२०१८ रोजीचा सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| **पान क्रमांक** | **नांव** | **स्वाक्षरी** |
|---|---|---|
| १ | श्री.भोर | |
| २ | श्री.राजेंद्र कडव | |
| ३ | श्री.किरण क्षिरसागर | |
| ४ | श्री.महेश तांबे | |

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : /०३/२०१८.

विषय : **सोमवार दिनांक २६/०२/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता झालेल्या मा.विशेष सभा क्रमांक ५ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २६/०२/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१०,६१०/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार सहाशे दहा फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीपाद छिंदम सदस्य अहमदनगर महानगरपालिका यांच्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ नुसार सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीपाद छिंदम सदस्य अहमदनगर महानगरपालिका यांच्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ नुसार सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीपाद छिंदम सदस्य अहमदनगर महानगरपालिका यांच्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ नुसार सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्रीपाद छिंदम सदस्य अहमदनगर महानगरपालिका यांच्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३ नुसार सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने नियमानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करावी.